करंजा, ता. उरण. जि. रायगड येथील मत्स्यबंदराच्या आराखड्यामध्ये करण्यात आलेल्या तांत्रिक बदलासंदर्भात समिती गठित करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः मत्स्यवि-१५१४/प्र.क्र.१७०/पदुम-१४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २२ फेब्रुवारी, २०२२

<u>**संदर्भ**</u> - १) केंद्र शासनाचे पत्र क्र. ३३०१३-४/२००५-Fy(H), दि. २८.०३.२०१८
२) समक्रमांकाचा शासन निर्णय दि. २७.०९.२०१८

<u>**प्रस्तावना -**</u>

करंजा, ता. उरण. जि. रायगड येथील मत्स्यबंदर बांधकामाच्या रु. १४९.८० कोटी इतक्या रकमेच्या कामास केंद्र शासनाने संदर्भ क्र. १ येथील पत्रान्वये तर राज्य शासनाने संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. केंद्र शासनामार्फत प्रशासकीय मान्यता देताना नमूद करण्यात आलेल्या बाबींपैकी काही बाबींमध्ये कपात करुन रु. १२४.४४ कोटीचे सुधारित अंदाजपत्रक तयार केलेले आहे. सदरचे बदल करताना केंद्र शासनाची तांत्रिक सल्लागार संस्था - केंद्रीय मत्स्यकी तटवर्ती अभियांत्रिकी संस्था यांचे अभिप्राय घेतले नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे करंजा मत्स्यबंदराच्या आराखड्यामध्ये करण्यात आलेल्या तांत्रिक बदलासंदर्भात समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

करंजा, ता. उरण. जि. रायगड येथील मत्स्यबंदराच्या आराखड्यामध्ये करण्यात आलेल्या तांत्रिक बदलासंदर्भात खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे :-

अ.क्र.	विभाग	पद
१	श्री मानस बेहरा, सिविल इंजिनिअरिंग विभाग, आय आय टी, मुंबई	अध्यक्ष
२	मुख्य अभियंता, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड (सा. बां. विभाग)	सदस्य
३	शास्त्रज्ञ - ई वर्ग, केंद्रीय जल व विद्युत अनुसंधान (Ministry of Jalshakti GoI), पुणे (CWPRS)	सदस्य
४	संचालक, केंद्रीय मत्स्यकी तटवर्ती अभियांत्रिकी संस्था (CICEF under Ministry of ADF, GoI)	सदस्य
५	कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई	सदस्य सचिव

२. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

अ) केंद्र शासनाने करंजा येथील मत्स्यबंदरास रु. १४९.९० कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देताना नमूद करण्यात आलेल्या बाबींपैकी काही बाबींमध्ये कपात करुन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने सुधारित केलेल्या रु. १२४.४४ कोटीच्या अंदाजपत्रकाची तांत्रिकदृष्ट्या तपासणी करणे.

आ) समितीने १ महिन्याच्या आत अहवाल सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२०२२२१५३१०३२७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrinivas
Jagannath Shastri

Digitally signed by Shrinivas Jagannath Shastri
DN: c=IN, o=Personal, title=2388,
pseudonym=ca8d31b3edf9920fda8c1d0f5f135a08db96d9d51605
2454832375d63a281822, postalCode=410210, st=Maharashtra,
serialNumber=c02f19ac7e7ab3a50d817c95cf483e33229cf0cbb032
83b175900630f81d2337, cn=Shrinivas Jagannath Shastri
Date: 2022.02.22 15:33:47 +05'30'

(श्रीनिवास शास्त्री)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
५. प्रधान सचिव (पदुम), मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. सह आयुक्त (सागरी), मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई विभाग, मुंबई.
९. कार्यकारी अभियंता, आयुक्त (मत्स्य) यांचे कार्यालय, मुंबई.
१०. श्री मानस बेहरा, सिविल इंजिनिअरिंग विभाग, आय आय टी, मुंबई.
११. मुख्य अभियंता, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड (सा. बां. विभाग)
१२. शास्त्रज्ञ - ई वर्ग, केंद्रीय जल व विद्युत अनुसंधान (Ministry of Jalshakti GoI), पुणे (CWPRS)
१३. संचालक, केंद्रीय मत्स्यकी तटवर्ती अभियांत्रिकी संस्था (CICEF under Ministry of ADF, GoI)
१४. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई.
१५. निवडनस्ती.